253

महाराष्ट्र पोलीस

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य**

**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१**

क्र. पोमसं /३६/ र. व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२३, मुंबई, दिनांक १३/०२/२०२४

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन,सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.संकीर्ण- १०२३/ प्र.क्र.५०/विशा-३ (अ) दिनांक १२ फेब्रुवारी, २०२४.

**विषय :-** शासकीय कामकाजासाठी अधिकृत ई-मेल व ई-ऑफिस सारख्या प्लॅटफॉर्मचा वापर करणे बंधनकारक करण्याबाबतच्य मार्गदर्शक सूचना निर्गमित करणेबाबत.

******

**परिपत्रक -**

महाराष्ट्र शासन,सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र. संकीर्ण- १०२३/ प्र.क्र.५०/विशा-३ (अ) दिनांक १२ फेब्रुवारी, २०२४. ची प्रत, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२४०२१२१७२५०१०४२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन परिपत्रकानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उप सहायक(र.व.का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य ,मुंबई (सस्नेह).
पोलीस महासंचालक, लोहमार्ग, / दहशतवाद विरोधी पथक, महाराष्ट्र राज्य, मुंबई (सस्नेह)
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्गसह).
अपर पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था / प्रशिक्षण व खास पथके /आस्थापना /प्रशासन नियोजन व समन्वय /विशेष कृती /रा.रा.पो.बल /वाहतूक / फोर्स वन /आर्थिक गुन्हे / महिला व बाल अत्याचार प्रतिबंध विभाग / नागरी हक्क संरक्षण), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग , महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक व संचालक, दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे.
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक
विशेष पोलीस महानिरीक्षक (कायदा व सुव्यवस्था/आस्थापना/प्रशासन/सायबर सुरक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
विशेष पोलीस महानिरीक्षक, व्हीआयपी सुरक्षा, मुंबई/मोटार परिवहन विभाग, पुणे/ नक्षल विरोधी अभियान,नागपूर.



Scanned with CamScanner

विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे व नागपूर.
संचालक व विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी,पुणे
उप संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.
पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर.
सर्व पोलीस अधीक्षक (गुन्हे / बिनतारी संदेश / लोहमार्गसह )
पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, सुराबर्डी, अमरावती रोड, नागपूर.
प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक.
सर्व प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्रे.
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१ ते १९
सहायक पोलीस महानिरीक्षक (का.व सु./ प्रशासन / नि. व स./ धोरण), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस महासंचालक यांचे वरिष्ठ उपसहायक/ उपसहायक
सर्व कार्यासन अधिकारी, का.क्र.०१ ते ४४

प्रत,

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके मध्ये “ सर्वसाधारण “ या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.



Scanned with CamScanner

शासकीय कामकाजासाठी अधिकृत ई-मेल व ई-ऑफिस सारख्या प्लॅटफॉर्मचा वापर करणे बंधनकारक करण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना निर्गमित करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांकः संकीर्ण-१०२३/प्र.क्र.१८४/विशा-३(अ)**
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक: १२.०२.२०२४

**संदर्भ:-** विशेष पोलीस महानिरीक्षक, सायबर यांचे दि.०९.१०.२०२३ रोजीचे पत्र क्र.२५७२/ Advisory/ MH-Cyber/२०२३

परिपत्रक

मा. उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव यांचे बनावट ईमेल खाते तयार करून सदर ईमेल खात्याद्वारे, विद्युत विभागाशी संबंधित ०६ अभियंत्यांच्या बनावट बदलीचे आदेश विद्युत विभागाला ईमेल करण्यात आले. बदली आदेशांवर मा. उप मुख्यमंत्र्यांच्या बनावट लेटरहेडवर बनावट स्वाक्षऱ्या असल्याचे निदर्शनास आले आहे.सदर बाबीचे गांभिर्य लक्षात घेऊन भविष्यात अशा बाबीची पुनरावृत्ती टाळण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत विशेष पोलीस महानिरीक्षक, सायबर, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी उपरोक्त संदर्भाधीन पत्रान्वये मार्गदर्शक सुचनांचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे. त्याअनुषंगाने सदर मार्गदर्शक सूचना सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयांच्या निर्दशनास आणण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

२. उपरोक्त प्रकरणाच्या अनुषंगाने, विशेष पोलीस महानिरीक्षक, सायबर, कार्यालयाने प्रस्तावित केल्याप्रमाणे शासकीय कामकाजासाठी सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग व त्यांच्या अधिनस्त कार्यरत असणाऱ्या कार्यालयासाठी अधिकृत ई-मेल व ई-ऑफिस सारख्या शासन मान्य प्लॅटफॉर्मचा वापर करणे बंधनकारक करण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना खालील प्रमाणे आहेत.

- शासकीय विभागांनी व त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयांनी एकमेकांशी पत्रव्यवहार करण्यासाठी व इतर व्यवहारासाठी नॅशनल इन्फॉर्मेटिक्स सेंटर (NIC) द्वारे अधिकृत केलेल्या gov.in/nic.in या डोमेन नेम (Domain name) चा वापर केलेल्या ई-मेलचा शासकीय कामकाजासाठी वापर करणे बंधनकारक करण्यात येत आहे.
- अधिकृत संप्रेषणासाठी ई-ऑफिस व तत्सम स्थापित सरकारी प्लॅटफॉर्मचा वापर करण्यात यावा.
- Gmail, Yahoo इ. सारख्या खाजगी सेवा प्रदात्यांकडून ईमेल आयडीद्वारे प्राप्त झालेले कोणतेही शासकीय कामकाजासंबंधीत माहिती अधिकृत मानली जाणार नाही.सबब, सदर खाजगी सेवा प्रदात्यांचा वापर शासकीय कामकाजासाठी प्रतिबंधित करण्यात यावा.
- तरी याबाबीची सर्व शासकीय विभागांनी व त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयांनी काटेकोर अंमलबजावणी करावी. जेणेकरून उपरोक्त उदाहरणात नमूद केल्याप्रमाणे घटना टाळता येतील.

३. सदर मार्गदर्शक सूचना या सर्व प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयांच्या निर्दशनास आणण्यात याव्या व त्याची काटेकोर अंमलबजावणी होत आहे याची दक्षता सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी घेण्यात यावी.

Scanned with CamScanner

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२४०२१२१७२५०१०४२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SUJATA MANOJ SAUNIK

Digitally signed by SUJATA MANOJ SAUNIK
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT,
2.5.4.20=04f6ff0d1ef522f4e19358cfac66e30d146fa47249c32a356455a756d05ec1a9, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=F49173DCDA3F795FF41A69777F5A6C2DED24F621CD434ABBB169565D1ABDAA1F, cn=SUJATA MANOJ SAUNIK
Date: 2024.02.12 17:33:59 +05'30'

(सुजाता सौनिक)

अपर मुख्य सचिव (गृह), महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.

२. मा. उपमुख्यमंत्री (गृह)यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.

३. मा. उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.

४. अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव/सचिव, यांचे स्वीय सहायक, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई.

५. प्रधान सचिव (विशेष), यांचे स्वीय सहायक, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई

६. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

७. अपर पोलीस महासंचालक (नि.व.स) महाराष्ट्र राज्य, मुंबई.

८. मा. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर.

९. विशेष पोलीस महानिरीक्षक,महाराष्ट्र सायबर, मुंबई.

१०. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,

११. निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई,

१२. निवड नस्ती (विशा-३)



Scanned with CamScanner